प्रकरण सहावे

# वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्य लढ्यात स्त्रीयांचा सहभाग

# वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांचा सहभाग

१. श्रीमती कुलकर्णी पद्मावती लक्ष्मण

२. श्रीमती देशपांडे इंदिराबाई विश्वनाथ

३. श्रीमती रणखांबे शकुंतलाबाई रामचंद्र

४. श्रीमती पाटणकर इंदुमती बाबुजी

५. श्रीमती जगताप सोनाबाई शंकर

६. श्रीमती बर्डे आक्काबाई

७. श्रीमती नायकवडी लक्ष्मीबाई रामचंद्र

८. श्रीमती पाटील राजमती

९. श्रीमती आष्टेकर कलावती तातोबा

१०.श्रीमती देशपांडे विमल विश्वनाथ

११.श्रीमती देशपांडे सेतूताई बन्याबापू

१२.श्रीमती देशपांडे सोनूताई अच्युत

१३.श्रीमती माळी अक्कुबाई बाबाजीराव

१४.श्रीमती यादव अक्काताई बाबूराव

ब्रिटीशांच्या विरोधात हिंदुस्थानात जो स्वातंत्र्य लढा झाला. त्यात पुरुषांनी महत्वाचे योगदान केले. त्याचप्रमाणे स्त्रीयांनीही योगदान केले किंवा पुरुषांना मोलाचे सहकार्य केले आहे. म.गांधीनी असहकार,कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह इ. माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ ग्रामीण भागातील जनतेपर्यत पोहोचवली. खेडयापाडयातून स्वदेशीचा व ग्रामराज्याचा पुरस्कार करीत इंग्रज हे परके आहेत व त्यांना येथून घालवले पाहिजे. अशी भारतीयांची मनोधारणा करण्याचे काम महात्मा गांधी यांनी फार चांगल्या पध्दतीने केले.

महात्मा गांधीचा छोडो भारत किंवा'करा अथवा मरा' हा संदेश खेडोपाडयातील गल्ली बोळातून पसरु लागला. देशभर जनतेचा लोकलढा सुरु झाला. कित्येकांनी आपले मोलाचे प्राण दिले. सातारा जिल्हयातील जनतेने तर घरादारावर तुळशीपत्र ठेवून व प्रापंचिक सुखाला लाथाडून लोकलढयाच्या पवित्र यज्ञात समिधा म्हणून आपला जीव ओवाळून टाकला. प्रतिसरकारची स्थापना करण्यात आली. या लढयात पुरुषांच्या बरोबरीने किंवा कांकणभर जास्तच असा पुढाकार महिलांनी घेतला होता. याचे उदाहरण म्हणजे १९३० च्याबिळाशीच्या जंगल सत्याग्रहात स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने प्रचंड संख्येने सहभागी झाल्या. एकंदरीत स्वातंत्र्य लढयात स्त्रीयांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग घेतलेला होता. त्यापैकी वाळवा तालुक्यातील काही स्त्री स्वातंत्र्यसैनिकांचा आढावा खाली देत आहे.

### १) पद्मावती लक्ष्मण कुलकर्णी

कासेगाव. ता.वाळवा,जि.सांगली

पद्मावती या लक्ष्मणराव कुलकर्णी म्हणजे प्रतिसरकारचे क्रांतीवीर धन्वतरी दादांच्या पत्नी होय. त्यांचा जन्म १९१६ साली कर्नाटक राज्यात ऐनापूर येथे झाला.[१] त्या

३री पर्यत शिकल्या असून हिंदू ब्राम्हण आहेत. त्यांच्या माहेरचे स्वातंत्र्यचळवळीत कोणी नव्हते.

१९३० ला वयाच्या १४ व्या वर्षी त्यांचे लग्न कासेगांवचे वैद्यव्यवसाय करणाऱ्या लक्ष्मण कुलकर्णीशी झाले. धन्वंतरी १९३० पासूनच चळवळीत होते. त्यांच्या पत्नीला ते पसंत नव्हते. शिवाय त्या कर्नाटकातील असल्यांने त्या चळवळीची माहितीही नव्हती. १९३२लाच धन्वतरींनी कराडमध्ये आपला वैद्यकिय व्यवसाय सुरु केला. १९४२ पर्यंत ते आपला व्यवसाय सांभळून चळवळीत काम करीत होते. तोपर्यत पद्मावतीबाईच्या मते कुटूंबाचे स्वास्थ्य, कौटुंबिक जीवन अतिशय सुस्थिर होते.

१९४२ च्या अंतिम पर्वात धन्वंतरी आपला व्यवसाय सोडून पूर्णपणे चळवळीत उतरले होते. भूमिगत चळवळीशी संधान बाधूंन प्रतिसरकारच्या निर्मितीचे घटक बनले. प्रतिसरकार अंतर्गत वेगवेगळया गटातील ते दुवा सांधत राहीले. धन्वंतरीदादा प्रतिसरकारच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य हाते. ते गांधीवादी नव्हते तर सुभाषबांबूच्या क्रांतीकारी विचारांकडे त्यांचा ओढा होता.[२]

१९४२ च्या अखेरीस शिरोडे स्टेशन जाळल्यानंतर धन्वंतरीदादा भूमिगत झाले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी दांदाविषयी माहिती मिळवण्यासाठी पद्माबाई व त्यांच्या दिरांना पोलीसांनी कराड पोलीस स्टेशनवर नेले व दादांविषायी चौकशी सुरु केली. पण पद्मावतींनी काहीच सांगितले नाही. शेवटी वालावलकर फौजदाराने भिती घालयला सुरुवात केली. 'धन्वतंरी कोठे आहेत ते सांगा नाहीतर तुमचे केशवपण करतो, बांगडया फोडतो, मंगळसुत्र काढतो' तरीही त्या गप्पच राहिल्या वास्तविक त्यांना धन्वंतरी कोठे आहेत, याबददल काहीच माहिती नव्हती. पण त्यांनी इतर कोणा मित्राचे नांव किंवा पत्ता सांगितला नाही. पद्मावतीबाईंना १५ दिवस कऱ्हाडला व १५ दिवस इस्लांमपूरच्या तुरुंगात ठेवण्यात आले. शेवटी त्यांना ?२०० रु. जामिनावर सोडण्यात आले.[३]

१९४२ ते १९४७ या काळात धन्वंतरी क्रांतीकारक म्हणून व त्यांच्यामागे पोलिसांचा ससेमिरा असल्याने पोलीसांच्या भितीने त्यांच्या घरी जवळचे कोणीच नातेवाईक येत नसत. पती भूमिगत व जवळचा नातेवाईकांनीही संबंध तोडल्याने साहजिकच पद्मावतीबाईंना वाईट वाटायचे.

पद्मावतीबाईंना प्रतिसरकारविषयी काहीही माहिती नाही. कारण त्या म्हणाल्या धन्वंतरीनी उंबऱ्याच्या बाहेरचे, उंबऱ्याच्या आत कधीच काही मला विश्वासात घेवून सांगितले नाही.

धन्वतंरी दादा १९४२ ते १९४७ या काळात भूमिगत होते. त्यांचे घराकडे अजिबात लक्ष नव्हते. कोणी नातेवाईकही पद्मावतीच्या मदतीला नसतांना त्यांना त्या काळात घर सांभाळणे, ही गृहीणीची भूमिका पार पाडल्याने धन्वंतरीना पूर्णवेळ चळवळीत काम करणे शक्य झाले.

## २) इंदिराबाई विश्वानाथ देशपांडे :

(तालुका:वाळवा, जि.सांगली)

इंदिराबाईंचा जन्म १९१० साली बागणी, ता.वाळवा येथे झाला. ४ थी पर्यंत शिकलेल्या इंदिराबाई हिंदू-ब्रम्हण आहेत. इंदिराबाईचे लग्न १९२६ ला वाळवा येथील विश्वनाथ देशपांडे यांचेशी झाले. लग्नाचेवेळी त्यांचे वय १५ वर्षाचे होते. देशपांडे हे कुटूंब वाळव्यात पहिल्यापासून पुरोगामी विचाराचे होते. लग्न झाले तेव्हांही श्री.देशपांडे चळवळीत होतेच ते गांधीवादी कार्यकर्ते होते. देशपांडे हे शेती व्यवसाय करणारे पण संपन्न कुटूंब, सुरुवातीला नवरा चळवळीत आहे याबद्दल वाईट वाटायचे पण देशपांडेनी समजावून सांगितल्यावर त्या देशपांडेच्या कार्यात सामील झाल्याचे इंदिराबाईनी सांगितले.

देशपांडे कुटूंब अस्पृश्यता पाळीत नसे. इंदिरा बाईंनी अशा अस्पृश्य स्त्रियांची बाळंतपणे केली. त्यांना आपल्या घरी जेवायला बोलवत. त्यांच्यासमवेत हळदी-कुंकू सारखे सांस्कृतीक कार्यक्रम करुन स्पृश्य-अस्पृश्य हा भेद नाहीसा करण्याचा प्रयत्न केला.[४]

देशपांडे घरी नसतानाही भूमिगत देशपांडे यांच्या घरी नेहमीच आश्रयाला येत तेंव्हा इंदिराबाई त्यांना जेवायला घालत. भूमिगत देशपांडे यांच्या घरी नेहमीच आश्रयाला येत असल्याने पोलीसांचा छापा घरावर वारंवार असे. पोलीस इंदिराबाईंशी अतिशय घाणेरडया भाषेत बोलत. पोलीसांचा सेन्नेमिरा चुकवण्यासाठी कित्येकदा घर तसेच टाकून त्या नातेवाईकांकडे आश्रयास जात असत. पण त्यांना कोणीच आश्रय देत नसे. तर उलट हिला आश्रय दिला तर हिचा नवरा कधीच सुधारणार नाही. हिला थोडे कष्ट पडले कि आपोआप तो चळवळीतून बाहेर पडून घरात थांबेल. अशी त्यांच्या नातेवाईकांची भूमिका होती.[५]

इंदिराबाईच्या आई, माहेरचे लोक इतर नातेवाईक हे देशपांडेच्या कामाबद्दल वाईट बोलत. गावातील व आसपासच्या स्त्रियांनीही इंदिराबाईशी संबंध तोडले होते. देशपांडे यांना पोलीसांनी पकडल्यावर गावातील लोकांची इंदिराबाईच्याबद्दल 'महारांना जेवायला घालते, पाप केलंय ते फेडतेय' अशी प्रतिक्रिया असे. स्वातंत्र्यानंतर वाळव्यातील शाळेस देणगी दिली व सार्वत्रिक निवडणुकांत काँग्रेसच्या उमेदवाराचा प्रचार इंदिराबाईंनी केला.

## ३) शकुंतलाबाई रा.रणखांबे :

(नेर्ले, ता.वाळवा.जि.सांगली)

शकुंतलाबाईंचा जन्म १९२६ ला सोनी येथे झाला. त्या इ.७ वी पर्यंत शिकल्या. त्यांच्या माहेरचे सर्वजण स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधी होते. शकुंतलाबाईंचे लग्न वयाच्या १३ व्या वर्षी १९४२ साली नेर्ले येथील श्री.रणखांबे यांच्याशी झाले. ते पेशाने प्राथमिक शिक्षक असले तरी चळवळीशी संबंधित होते. शकुंतलाबाईंच्या माहेरच्या मंडळींना ही बातमी लग्न ठरल्यानंतर समजली परिणामी त्यांनी लग्नाला विरोध केला. शकुंतलाबाईंच्या

भावाच्या एका मित्रानें मुलगा चळवळीत असला तरी संसारी आहे. तो चळवळीत रहायचा नाही. हे पटवून दिले तेंव्हा शकुंतलाबाईंचे लग्न झाले.

लग्नानंतर लवकरच रणखांबे गुरुजींनी शकुंतलाबाईंना नेर्ले येथील सेवादलात सहभागी केले.[६] १५ दिवस शकुंतलाबाईंनां सेवादलाच्या प्रशिक्षणासाठी पाठवले. प्रशिक्षणानंतर त्यांनी नेर्लेतील मुलींना कवायत शिकवली. नंतर गावातील स्वच्छता करण्यास सुरुवात केली. निराधार बायकांची सेवा केली. आठवडयातून एक-दोन वेळा त्या व्याख्याने देत ही व्याख्याने स्वातंत्र्य, त्यासाठी काय करीत आहोत व काय केले पाहिजे या विषयावरील असत. शकुंतलाबाईंनी येवलेवाडीत चरखा वर्ग चालवला. नेर्ले येथे प्रभात फेरी, सायंफेरी काढल्या. अस्पृश्य वस्तीत साफसफाई करुन त्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. मुलांना शाळेत घालण्यासाठी त्यांचे मन वळविले. त्यांनी या आंदोलनात जास्तीत जास्त सेवादलाचे काम केले. भूमिगतांना जेवण व आश्रय दिला.

१९४४ च्या सुमारास रणखांबे गुरुजी व शकुंतलाबाई सातारला स्थायिक झाल्या. तिथे त्यांनी 'जनक्रांती' हे वर्तमानपत्र सुरु केले. हे वर्तमानपत्र मुख्यतः चळवळीला वाहिलेले होते. यातून चळवळीतील कार्यकर्त्यांची भाषणे प्रसिध्द् केली. शकुंतलाबाई या वर्तमानपत्राच्या संपादिका होत्या.[७]

### ४) इंदूमती बाबुजी पाटणकर :

(कासेगांव, ता.वाळवा.जि.सांगली)

क्रांतीवीर बाबुजी पाटणकर यांच्या पत्नी म्हणजे इंदूमती पाटणकर यांचे माहेर इंदोली, ता.कराड,जि.सातारा येथील. प्रथमपासूनच इंदोली हे चळवळीचे प्रमुख केंद्र होते. इंदूताईंचा जन्म १९२५ साली झाला. त्यांचे वडील दिनकरराव नाथाजी निकम, हे इंदोलीतील संपन्न शेतकरी होते. राजू आप्पा लिमये व सिताराम गरुड यांनी चळवळींचे संस्कार दिनकररावांवर केले. १९३० सालापासून ते राष्ट्रीय काँग्रेसचे कार्यकर्ते बनले.

स्वतःला त्यांनी असहकार चळवळीत झोकून दिले. दिनकररावांना सामान्यांच्याबदद्ल व एकूणच तळागाळातील लोकांच्याबदद्ल सहानुभूती होती. बहुजन समाजाचे समाजकारण, राजकारण ते करु लागले. इंदोलीच्या पंचक्रोशीचे ते नेतृत्त्व करु लागले. हाच वारसा इंदूताईंकडे चालत आला. त्यांनी इंदूताईंना कसेबसे ७ वी पर्यंत शिकवले.

इंदूताईंना समजायला लागल्यापासून घरात राजकीय वातावरण होते. मिठाचा सत्याग्रह, फैजपूर काँग्रेस, सायमन कमिशन, राजेंद्रप्रसाद व जवाहरलाल नेहरु यांचे कार्यक्रम इ. राष्ट्रीय पातळीवरचे कार्यक्रम पहिल्यापासून पाहिले. त्या काळात सेवादलाची जी काही शिबीरे , शेतकरी सभा, सहभोजन इ. ठिकाणी दिनकरराव निकम, ताईंना आपल्याबरोबर घेऊन जात.[८] तेंव्हा वडीलांचा हेतू त्यांना राजकिय शिक्षण देणे हा नव्हता. लाडकी मुलगी म्हणून ते सहज बरोबर घेवून जात. राष्ट्रीय कार्यक्रम असल्यास किंवा कराडला जर राष्ट्रीय वृत्ती निर्माण करणारे चित्रपट आले तर दिनकरराव निकम मुलीला व त्यांच्या पत्नीस कराडला पाठवित. यातूनच इंदूताईंचा क्रांतिकारी पिंड तयार झाला.

१९४१ ला इंदोलीत वैयक्तिक सत्याग्रह झाला. त्यात भाग घेणाऱ्या १२५ लोकांच्यावर खटले भरले व त्यांची येरवडयाला रवानगी करण्यात आली. तुरुंगातील लोकांची जी पत्रे येत ती त्यांच्या कुटूंबियांना वाचून दाखवून त्यानां उत्तरे पाठवण्याचे काम इंदुताई करत.[९] व्ही.डी. चितळे व दिनकरराव निकमांची ओळख येरवडयाच्या तुरुंगात झाली होती. चितळयांच्या सान्निध्यात निकम कम्युनिस्ट बनलें.

दिनकरराव निकम येरवडयाच्या तुरुगात असतानाच ४२ ची चळवळ सुरु झाली. तुरुंगात पत्र सेन्सॉर करतात हे इंदूताईंना समजले होते. म्हणून त्यांनी बाहेरील चळवळीचे स्वरुप सांकेतिक भाषेत वडीलांना कळवले. त्यांच्या पत्राचे जेलमध्ये सामुदाईक वाचन सुरु झाले. सांकेतिक मजकूर असा असे --

' गेल्या सोमवारी गावात वावटळ आली होती. (पोलीसांची धाड पडली होती) ५,५० पाखरांचा थवा होता.(५,५० पोलीस होते) त्यामध्ये २ पांढरे बगळे, ४ डोमकावळे

होते.(२ इंग्रज अधिकारी व ४ काळे फौजदार)साऱ्या पिकांवर पाखरांनी धाड घातली. (गावांवर छापा घातला) लाड काकी, शेख मावशी त्यादिवशी आपल्या मळयात मुक्कामास होत्या.(भूमिगत कार्यकर्ते जी.डी.लाड, शेखकाका गावात मुक्कामाला होते) त्या वावटळीने त्या सापडल्या असत्या पण ऊसाच्या फडात लपून बसल्यामुळे सापडल्या नाहीत. नंतर लाडकाकी कुंडलला व शेखमावशी वाठारला सुखरुप पोहोचल्याचा निरोप आला आहे.[१०]

दुसऱ्या पत्रात अशीच सांकेतिक भाषा होती. कासेगावचे वैदय येवून गेले. २ पोती युरिया व ५ गाड्या शेणखत पाठवून दिले आहे.(२ पिस्तुले ,५ बंदुका) ही खते कोरेगावच्या बोराटे यांच्याकडे पाठवून दिली आहेत.(फरारी कार्यकर्ते तात्या बोराटे) एका पत्रात किसनआबा-वाईला,पांडूमामा-कुंडलला तीर्थयात्रेवरुन सुखरुप पोहोचल्याचा कराडच्या डॉक्टरांचा निरोप आला आहे. (आम्ही येरवडयात असतांना किसनवीर, पांडूमास्तर, जेल फोडून पळून गेले. ते सुखरुप पोहोचल्याचा निरोप कराडचे डॉक्टर डी.जी.देशपांडे यांनी दिला आहे.)आपल्या भागात पाऊसपाणी चांगले असल्यामुळे यंदाही राशीला चांगला उतारा पडेल अशी बोलवा आहे.(लोकांचे सहकार्य चांगले असल्याने चळवळ जोरात सुरु आहे) अशी ही सांकेतिक पत्रे या मुलीकडून वडिलांना वरचेवर येत. सांकेतिक भाषेच्या तंत्राचा अवलंब त्यांनी लेनिनच्या पुस्तकातून स्विकारला. ताईंना प्रोत्साहन मिळावे म्हणून या कार्यकर्त्यांनी नंतर पुण्या-मुंबईहून ताईंना पुस्तके पाठविली.[११]

१९४१च्या सत्याग्रहाची शिक्षा भोगून लोक परत आले. आंदोलनाची तयारी सतत चालूच होती. इंदूताई सेवादलात काम करु लागल्या. तासगांव, वडूज,इस्लामपूर,येथिल मोर्चावर पोलीसांनी गोळीबार केला. अनेक कार्यकर्ते धारातीर्थी पडले. त्यामुळे बाकीच्या कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून ब्रिटिशांविरोधी चळवळ चालू ठेवण्याचे ठरवले. इंदोली भागातील तुकाराम कोडगुळे व इंदूताई यांनी भूमिगत अवस्थेत काम करावयाचे ठरवले. वडिलांना ही गोष्ट आवडणारी नव्हती. परंतु ताईची अस्मिता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती.

यानंतर ताईनी वाळवा हे आपले कार्यक्षेत्र निवडले.[१२] भूमिगत अवस्थेतच १५० स्त्रियांचे सेवादल शिबिर कासेगांवी घेतले. जिल्हयातील सर्व स्तरातील स्त्रीया त्यात सहभागी झाल्या. विधवा परित्यक्ता, गांधी पध्दतीची बीन खर्चाची लग्ने, अस्पृश्यता निवारण, मंदिर प्रवेश, सहभोज्न आदि विषय राजकीय प्रश्नांबरोबर होतेच. प्रबोदनाद्वारे जागृती होत होती. भूमिगतांचे मार्गदर्शन शिबिरातून होत होते. बिळाशीच्या जंगल सत्याग्रहापासून ते १९४१ च्या त्रैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतलेल्या स्त्रीया या शिबीरास हजर होत्या. बिळाशीचे बाबूराव चरणकर, यांची बहिण सोनूताई देशपांडे, मुक्ताबाई साठे, तांबव्याच्या यशोदा पाटील, धारेवाडीच्या कलावती खोत इ. स्त्रीया आपलं घर सोडून १५ दिवस शिबिरात प्रबोधनासाठी व लढयाच मार्गदर्शन घेण्यासाठी रमल्या.

ताईंनी वाळवे तालुक्यात घरोघरी फिरुन स्त्रीयांना काँग्रेसचे सभासद केले. हत्यारे पोहचवणे, पत्रकांचे वितरण, न्यायदान मंडळात निर्णय घेण्यात पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला. पोलीसांचा ससेमिरा सुरु होताच सासवड येथे प्रेमाताई कंटक यांच्या आश्रमात तीन महिने वास्तव्य केले. नंतर काही दिवस मुंबईला वास्तव्य केले. मुंबईत तेव्हा समाजवादाचे अभ्यासमंडळ सुरु होते. त्या वर्गास त्या जात असत. तिथेच इंदूताईची श्री.बाबूजी पाटणकरांशी ओळख झाली व पुढे त्यांच्याशी लग्न झाले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजवादी पक्षास व नंतर कम्युनिस्ट विचारसरणी स्विकारली. शोषणमुक्त समाजव्यवस्था येण्याचेदृष्टिने कार्यक्रम घेवून काम सुरु केले. दुष्काळ निर्मूलन धरणग्रस्तांच्या पुर्नवसनाचे लढे, परित्यिक्तांचे लढे यात इंदूताई सध्या कार्यरत आहेत. [१३]

## ५) सोनाबाई शंकर जगताप

(येवलेवाडी, ता.वाळवा.जि.सांगली)

सोनाबाई शंकर जगताप यांचा जन्म १९२२ ला दुधगांव ता.मिरज,जि.सांगली येथे झाला. सोनाबाईंचे शिक्षण इयत्ता ४ थी पर्यंत झाले.

सोनाबाईचे लग्न वयाच्या ९ व्या वर्षी १९३१ ला येवलेवाडी येथील श्री.शंकर जगताप या तरुणाशी झाले. त्यांचे पती चळवळीत कार्यरत होते. लग्नानंतर सोनाबाईंनी त्यांना चळवळीत काम करण्यास विरोध केला. कारण सोनाबाई सांगतात जगताप मोड-तोड, जाळपोळ इ.ब्रिटीश सत्तेविरुध्द कामात भाग घेत होते, व हे काम कायदयाविरुध्द आहे त्याचा परिणाम चांगला नाही असे त्यांना वाटले. सोनाबाईंच्या विरोधानंतर जगताप चळवळीतून बाहेर पडले. सोनाबाई स्वतः मात्र सेवादलात दाखल झाल्या. येवलेवाडीत सेवादल होते. तिथे ५०/६० स्त्रिया व मुली होत्या. सोनाबाईंनी सेवादला अंतर्गत गावाची स्वच्छता केली. साक्षरता प्रचारासाठी प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक कार्यात त्यांचा सहभाग होता.[१४]

## ६) श्रीमती आक्काताई बर्डे /विजया दादा बर्डे

कोणत्याही थोर पुरुषांच्या जीवनात त्यांच्या पत्नीचे स्थान महत्त्वाचे मानले जाते. तिचे सहकार्य मोलाचे असते. क्रांतीवीर दादा आप्पाजी बर्डे गुरुजी यांच्या जीवनकार्यात त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती विजयादेवी बर्डे उर्फ आक्काताई बर्डे यांचे स्थान अनन्यसाधारण आहे.

श्रीमती आक्काताई बर्डे यांचा जन्म बेळगांव येथील आवलवकी या प्रसिध्द् घराण्यात, आजोळी झाला. त्यांचे मूळगांव/माहेर निपाणी. आई-वडील सुशिल व धार्मिक होते. वडील गंगारामदादा सगरे प्राथमिक शिक्षक होते. आपल्या मुला-मुलींवर त्यांनी चांगले संस्कार बिंबवले. आक्काताईंचे शिक्षण निपाणी येथे इयत्ता ७ वी पर्यंत झाले.

पारतंत्र्याचा काळ आणि तत्कालीन समाजात वैफल्य अवस्था फार मोठी होती. अनिष्ठ रुढी,चालीरिती अज्ञान पसरले होते. ते दूर करण्याचे काम त्यावेळच्या शिक्षकांना करणे आवश्यक होते. शिक्षणतूनच माणूस जागा केला पाहीजे आणि तो माणूस म्हणून जगला पाहिजे. यासाठी त्यांनी हयात घालविली. गुलामगिरीचे चटके त्यांना वेळोवेळी बसत होते. ते त्यांनी निमूटपणे सहन केले व सुसंस्कृत मानवासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. ध्येयवादी शिक्षकातूनच चांगली सुसंस्कृत पिढी निर्माण होते. त्यातून नवभारताची उभारणी करता येईल. या एकाच ध्येयाने प्रेरीत होवून आपली मुलगी एका शिक्षकाला दयावी असा मनाचा निश्चय केला. तसा शोध घेवून त्यांनी बुध्दीमान, ध्येयनिष्ठ,धाडशी व क्रांतीकारक प्राथमिक शिक्षक दादा आप्पाजी बर्डे गुरुजी यांच्याशी सन १९३९ साली गांधी पध्दतीने निपाणी येथे विवाह केला.

क्रांतीवीर बर्डे गुरुजींनी ४ एप्रिल, १९३० रोजी आपल्या शिक्षकी पेशाचा राजीनामा देवून जीवनयुध्द सुरु केले. १९३०, ३२ व १९३५ नंतर त्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी मिळाली. स्वातंत्र्ययुध्द व संसार यांचा त्यांना कधीच मिलाफ साधता आला नाही. संसार सुखाकडे संपूर्ण दुर्लक्ष झालं होते. अशावेळी त्यांच्या धर्मपत्नीने नैराश्य न पत्करता संसार सुखाला लाथ मारुन पतीला साथ देण्याचा विडा उचलला.[१५]

१९४२ च्या स्वातंत्र्य लढयात क्रांतीवीर बर्डे गुरुजी भूमिगत राहून तर केंव्हा केंव्हा उघडपणे प्राणपणाने भाग घेत. ते ब्रिटिश सरकार व क्रिमिनल गुंडांशी दुहेरी झुंज देत असल्याने त्यांच्या वाडयावर पोलीस व क्रिमिनल गुंड लोक यांचे छापे वारंवार पडत असल्याने श्रीमती विजया बर्डे व घरातील लोकांना फार यातना सहनकराव्या लागल्या. अशावेळी त्या झाशीच्या राणीसारख्या विरक्षीने उभ्या रहात. स्वातंत्र्य चळवळीतील वाळवा, शिराळा तालुक्यातीलच नव्हेतर सातारा जिल्हयातील अनेक भूमिगतांना भोजन प्रसंगानुरुप आश्रय त्यांनी दिला.[१६]

आपल्या पतीवर ज्या ज्या वेळी अनेक संकटे आली व काही प्रसंगी वादळ उठली त्यावेळी अधिक धाडसाने जोमाने विजयादेवी त्याच्या पाठीशी उभ्या राहिल्या.

## ७) लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी :

(वाळवा, जि.सांगली)

लक्ष्मीबाईचा जन्म १९०२ साली कलकत्ता येथे झाला. त्यांचे शिक्षण इ.३ री पर्यत झाले असून त्या हिंदू-मराठा कुटूंबातील आहेत. लक्ष्मीबाईचे वडील संभाजीराव हे लष्करामध्ये होते. त्यामुळे त्यांचे बालपण कलकत्याला गेले. त्यांचे माहेर मिरजवाडी,जि.सांगली येथील. माहेरचे चळवळीशी संबंधीत असे कोणी नाही.

लक्ष्मीबाईचे लग्न वाळव्यातील रामचंद्र नायकवडी या शेतकरी तरुणाशी झाले. पण रामचंद्र नायकवडी हे चळवळीत सहभागी नव्हते. त्यांना दोन मुले क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी हा त्यांचा मोठा मुंलगा. नागनाथ आण्णा लहाणापासूनच वाळव्याचा सेवादलात काम करायचे. दलित वस्तीतून स्वच्छता करणे, रस्ते झाडणे यात आघाडीवर असायचे. पण त्यांच्या या कामास वडिलांचा विरोध होता. कुस्तीगिर व्हावा शाळा, शिकावी अगदीच नाहीतर घरच्या शेतीत काम करावे असे त्यांना वाटे. पण नागनाथ आण्णा शाळा सोडून चळवळीत कार्य करु लागले. तेव्हा आपला मुलगा वाया गेला. म्हणून रामचंद्र नायकवडी आण्णांना व लक्ष्मीबाईंना मारायचे. पण वडिलांच्या विरोधाला न् जुमानता नागनाथ आण्णा चळवळीत पडून भूमिगत झाले. भूमिगत असतांना नागनाथ आण्णांना शोधायला पोलीस घरी यायचे तेव्हा घरातील सर्व साहित्य अस्ताव्यस्त पडलेले असायचे.

नागनाथ आण्णा सहा-सहा महिने घरी येत नव्हते. त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई त्यांना घराकडून गुपचूप जेवण पोहोचते करायच्या.[१७] जेवण देणाऱ्या व्यक्तीकडून दोन्हीकडील बातम्या आईला व मुलाला इत्यंभूत समजायच्या. आईला आपला मुलगा कुठें आहे याचा पत्ता असायचा, परंतु इंग्रज सरकारनं त्यांच्या गळयावर सुरी ठेवली तरी सुध्दा

त्या आपल्या मुलाचा पत्ता कधी कुणांला सांगायच्या नाहीत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यांचा खूप छळ केला. ८-१५ दिवसातून वरचेवर त्यांच्या घरावर सशस्त्र पोलीसांचा छापा असायचा. प्रत्येक छाप्याच्या वेळी 'तुझा मुलगा कुठं आहे सांग ' ? असे म्हणून त्रास देत. लक्ष्मीबाईंचे उत्तर ठरलेले आसायचे 'मला कायरं ठाव?' डी.एस.पी.फौजदार , पोलीस बंदुकी घेवून त्यांच्या सामोरी येत त्यावेळी त्या म्हणत 'आरं असल्या फुकण्या मी लई बघीतल्यातं, मला या फुकण्यांची भिती नगं मी त्याला भिणार नाही. नागनाथ देशासाठी, स्वराज्यासाठी वण-वण करत फिरतुया तुम्ही इंग्रज सरकारचं तुकड खाणार चाकुर हायसा त्यो कुठं हाय ते मला काय इचारता सारं ? हिम्मत असली तर त्याला धरुन दावा की !'अशा स्पष्ट व खरमरीत उत्तरानं त्यांची तोंड काळी पडायची. बायका माणसांना धमकावयाची व कमी जास्त बोलण्याची हिम्मत होत नव्हती.[१८] लक्ष्मीबाईंची दोन चार वेळा तुरुंगात रवानगी सुध्दा केली होती. परंतु त्याला त्या डगमगल्या नाहीत. मुलासाठी, देशांसाठी त्यांनी प्राणाची पर्वा केली नाही.

एकदा डी.एस.पी. ने अचानक छापा घातला. त्याला घरात नागनाथ दडून बसला असल्याची दाट शंका आली व 'दार उघडा ' म्हणून दारावर बुटाची लाथ मारली . लक्ष्मीबाईंनी दार लवकर उघडले नाही त्याची शंका अधिकच बळावली. व त्यानं लाथा मारुन दार मोडले. व तुझा मुंलगा कुठं आहे सांग ? लक्ष्मीबाई वाघिणीसारखी खवळून आली व म्हणाली 'मेल्या, गरिबाचं दार मोडलसं, तुला लाज वाटत नाही ? मराठमोळया शेतकऱ्याच्या घरी पुरुष मंडळी नसतांना दार मोडायचे कारण काय तुला ? असे म्हणून वाघिणीनं त्या साहेबाची बंदुक बेधडक धरुन दोन चार हिसडे त्याला दिले व म्हणाली 'समदं घर हुडिक तुला कुठं मुलगा सापडला तर धरकी त्याला. साहेब दोन हिसडयात नरम पडला होता. तो घर शोधू लागला. घर शेधत असता त्याला लक्ष्मीबाई म्हणायच्या त्या तिथे त्यो दडून बसलाय बघ ! त्यानं तुला गोळी घातली तर फुकट मरशील धडभल्यान आपल्या बायका मुलात जा ! साहेब आपल्या जिवाला भीत भीतच बघायचा ! दबकायचा लक्ष्मीबाई

खो-खो हसायच्या. अशी फजिती झाल्यानंतर साहेब काळ तोंड घेवून निघून जायचा. परंतू दुसऱ्या दिवशी साहेबाने लक्ष्मीबाईंची रवानगी ६ महिन्यांच्या मुदतीने पुण्याच्या तुरूंगात केली. पुण्याच्या जेलमध्ये अरूणा असफअली सारख्या बऱ्याच स्त्रीया होत्या. चार महिन्यात लक्ष्मीबाई सर्वांच्या राष्ट्रमाता बनल्या.[१९] तेथेही पोलिसांना त्यांनी हैराण करून सोडलं. त्यांना जास्त दिवस जेलमध्ये राहण आवडत नव्हत. कारण मुलाला योग्य मार्गदर्शन करणे, त्याच्यावर घारीसारखी नजर ठेवणे, त्याची शिदोरी पोहचवणे या गोष्टी जेलमध्ये राहून करता येत नव्हत्या. त्यांनी स्वतःची सुटका लवकर व्हावी म्हणून वेडयाचे सोंग घेतलं. सरकारला वाटत होतं आईला तुरूंगात घातलं कि मुलगा वाळव्यास येईल. मग आपण त्याला पकडू परंतू झाले उलटेच ! लक्ष्मीबाईंना सरकारन सहा महिन्याऐवजी तीन महिन्यातच जेलमधून सोडले.[२०] आईने मुलासाठी, देशासाठी वेड घेतलं होत हे कुणाला कस कळणारं? आई जेलमधून आल्यानंतर नागनाथ आठ-पंधरा दिवसांनी आईला भेटण्यासाठी आपल्या जिवलग मित्रांसह आले.

लक्ष्मीबाई भूमिगतांचे निरोप पोहोचवित असत. त्यांना जेवायला घालीत असत. त्यांना आश्रय देत असत. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना वेगवेगळया कालावधीत साडेआठ महिने तुरूंगवास झाला. तुरूंगात असताना लक्ष्मीबाईंनी जातीभेद पाळला नाही. किंवा त्यांनाही तिथे तसा अनुभव आला नाही. भूमिगत कार्यकर्ता घरी आल्यानंतर त्याला जात विचारायची त्यांना आवश्यकताही भासली नाही.

लक्ष्मीबाईंनी वाळव्यातील न्यायदान मंडळात लक्ष घालून नवऱ्यानं सोडून दिलेल्या स्त्रीयांना मध्यस्ती करून परत नव-याच्या घरी पाठवले.[२१]

नागनाथ आण्णा व लक्ष्मीबाईंच्या या कामगिरीबद्दल गावाने त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता. गावातील स्त्रीया, ''हिच्यामुळे इंग्रज जाणार आहेत काय म्हणून कुचेष्टा करायच्या. त्याबरोबरच स्त्रीयांच्या कार्यक्रमास, उत्सवास किंवा सण असल्यास

लक्ष्मीबाईंना बोलावयाच्या नाहीत. मुलामुळे आपल्याला नाहक त्रास होतो. याबद्दल त्यांना कधीही वाईट वाटले नाही.

## ८. राजमती पाटील

वाळवे तालूक्यातील ऐत्वडे बुद्रूक या गावचे दादासो बाबाजी पाटील व हिराबाई यांना तीन मुले होती. चंपाबाई.राजुताई व मुलगा आदगोंडा, पैकी ब्रिटीशांच्या विरोधात ज्यांनी स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवली त्या म्हणजे राजुताई होय. लहानपणी त्यांच्या हातून घडलेल्या छोटयाशा चुकीमुळे आई स्वर्गवाशी झाली. त्यांनी आपला लहान भाउ आदगोंडाला पोरकेपण जाणवू दयायचे नाही असे ठरवले. आदगोंडासाठी त्यांनी आजन्म अविवाहीत राहण्याचा खंबीर निर्णय घेतला. बहिणीने आणि वडिलांनी त्यांना लग्नासाठी खूप आग्रह केला परंतू त्या तयार झाल्या नाहीत. आदगोंडाचे ५ वी पर्यंतचे शिक्षण गावात झाल्यावर त्याला बाहुबली येथील गुरूकुल आश्रमात घातले.

बाहुबली येथील समंतभद्र महाराजांच्या सहकार्याने राजुताईंनीं सोलापूरच्या श्राविकाश्रमात शैक्षणिक कार्यास सुरूवात केली. (श्राविकाश्रम राजुलमती शहा या चालवत होत्या ) १९३६ ला त्यांच्या शैक्षणिक कार्यास सुरूवात झाली होती. राजुलमतीबाईंनी त्यांना खेळाच्या प्रशिक्षणासाठी पाठवले. लेझीम, डंबेल्स, घुंगुरकाठी व मैदानी कवायतीचे सगळे प्रकार शिकून घेतले. हे सारे खेळ त्यांनी इतर मुलींनाही शिकवले. त्यांच्या बोलक्या स्वभावामुळे त्या सर्वांच्या लाडक्यां बनल्या. त्यांना अनेक मैत्रिणी मिळाल्या. मुनींची सेवा करत ५ वी पर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले.

श्राविकाश्रमात असतानाच राजुताईंवर क्रांतीकार्याचा प्रभाव पडला. कारण आश्रमातल्या अनेक महिला चळवळीत सहभागी झाल्या होत्या. महात्मा गांधीनी ''क्विट इंडिया, छोडो भारत'' गोवालिया टँक मैदानातून भारतीय जनतेला एक नवा मंत्र दिला 'करा अथवा मरा ' ९ ऑगष्ट १९४२ ला घोषणा व्हायची होती. तोपर्यंत पहाटेच महात्मा

गांधीसह सर्व पुढाऱ्यांना इंग्रजांनी अटक केली. लाठीमार, गोळीबार, आणि अटक सत्राच्या बातम्या देशभर पसरू लागल्या. सोलापूरातही आश्रमातल्या मुलींनी चौकात मिरवणूक काढण्याचे ठरवले. अनंतमती चोडके यांनी राजुताईंना त्यांच्यात सहभागी करून घेतले. राजुताईंनां झेंडा चौकात नेवून इंग्रजांच्या जुलमी सत्तेचा निषेध करण्याच्या घोषणा केल्या. तिथेच ताईंना पोलीसांनी पकडले. दुसऱ्या दिवशी मॅजिस्ट्रेटपुढे त्यांना उभे केले.

छत्रुसिंग चंदेले, कॉ. विभूते यांनी राजुताईकडे काही पत्रके दिली होती. राजुताईंनी ती मोठया धाडसाने मॅजिस्ट्रटपुढे फेकली व 'महात्मा गांधी कि जय ' अशी घोषणा केली. मॅजिस्ट्रटने अपमानासाठी ३ महिने सजा व दोनशे रूपये दंडाची जादा सजा दिली. दोनशे रूपये नसल्यामुळे २ महिन्यांची सक्त मजूरीची जादा शिक्षा ठोठावली. सोलापूरच्या तुरूंगात त्यांची रवानगी केली जात असतानाच छत्रूसिंग यांच्या सल्ल्यानुसार ताईंनी आपणास येरवडा जेलमध्ये ठेवावे अशी विनंती केली. त्यानुसार ११ ऑगष्ट, १९४३ रोजी त्यांना येरवडयाला हलवले.[२३] येरवडा जेलमध्ये राजकैदी असलेल्या महिला विभागात ताईंना दाखल केले. त्या बराकीत अरूणा असफअली, उषा मेहता, प्रेका कंटक, लिलाताई पाटील, आणि वाळव्याच्या क्रांतीमाता लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी या होत्या . क्रांतीमातेने राजुताईला आपली मुलगी मानले. राज-कैदयांच्या सहवासात राजुताईंनी क्रांतीकार्याचे प्रशिक्षण घेतले. तेथे त्यांना अनेक बौध्दीके ऐकावयास मिळाली. राजुताईचे प्रत्येक काम आखिव रेखीव असल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रभाव तुरूंगाधिकाऱ्यांवर पडला. चांगल्या वर्तणूकीबद्दल शिक्षेत सूट देण्याचे ठरवून ६ महिन्यातच १५/१/१९४४ रोजी त्यांची सुटका केली .[२४]

सुटकेनंतर राजुताईंनी वाळवा-शिराळा भागातील नागनाथ नायकवडी व लक्ष्मीबाई यांच्या ग्रुपमध्ये राहून काम करण्याचे ठरवले. सोलापूरहून राजुताई आपल्या घरी ऐतवडयास आल्या. त्यांच्या वडिलांनी त्यांच्यावर आगपाखड केली. ''कुणाला बट्टा लावलास '' असा आरोप केला.

क्रांतीसिंह नाना पाटील यांना प्रतिसरकारचे प्रमुखपद देवून वेगवेगळया गावी १८ ग्रुप स्थापन करण्यात आले पैकी वाळवा ग्रुपमध्ये प्रमुख म्हणून नागनाथ नायकवडी, वाय.सी.पाटील, उपप्रमुख म्हणून किसन आहिर, राजमती पाटील यांचा समावेश करण्यात आला.[२५] विविध शाखांना माहिती पुरवण्यासाठी ''स्वतंत्र भारत'' नावाचे पत्रक काढले जाई . निरोप पोहचवण्यासाठी धावपटू असत. वाटेगावचे टुरिंग पाटील हे वेगाने धावण्यात पटाईत होते. वाळवे भागातील स्त्रीयांमध्ये राजुताईंनी आपल्या बहाद्दुरीने वेगळाच ठसा उमटवला. ऐतवडे बुद्रुक गावचे केंद्र त्या सांभाळत होत्या. वेगवेगळया पोशाखात वावरणे, खांदयावर रायफल टाकून घोडयावरून रपेट मारणे, हा त्यांच्या जीवनाचाच एक भाग बनला. उदा. इंदूताई, यशोदा तांबवेकर यांनी प्रमिला गरवारे यांच्या सहकार्याने कासेगांवला स्त्रीयांचे शिबीर घेतले. त्या काळात सुमारे ५ हजार स्त्रीया कॉंग्रेसच्या सभासद झाल्या. त्यामुळे त्या काळात स्त्रीयांनी पुरूषांच्या बरोबरीने चळवळीस सहकार्य केले. राजुताईसारख्या महत्त्वाकांक्षी युवतीने हातात रायफल घेवून पुरूषांच्या बरोबरीने किंबहूना कांकणभर चढच अशी मर्दुमकी क्रांती घडवून आणली .[२६]

क्रांतीकारकांच्या गोटात सामील झाल्यानंतर राजुताईंच्या आयुष्यात एक वेगळेच वळण लागले. लक्ष्मीबाई नायकवडी यांच्या मार्गदर्शनाखाली एका विमनस्क अवस्थेत राजुताईंनी कामाला सुरूवात केली. नागनाथ नायकवडी, त्यांचे सहकारी व राजुताई यांनी ऐतवडे, ढगेवाडी, थाबडे, सोनवडे या परिसरात पराक्रमाची पराकाष्टा केली.

राजुताईंनी ऐतवडे गावचे चळवळीतील नेतृत्त्व स्विकारल्यानंतर श्राविकाश्रम हे पूर्वभागातील एक केंद्र सातारा जिल्हयातील कार्यकर्त्यांना लाभले सातारा जिल्यात एखादी ॲक्शन घडवून क्रांतीकारक श्राविकाश्रमात आश्रय घेत. राजुताई अतिशय प्रामाणिक होत्या. येईल ते संकट शिरावर घेण्याची त्यांची एक जबरदस्त मानसिक तयारी होती. प्रसंगावधानाबाबतीत त्या विलक्षण तरबेज होत्या.

## चाणाक्ष राजुताई :

एका प्रसंगातला त्यांचा चाणाक्षपणा -

त्यावेळी पोर्तुगिजांच्या गोव्यात पिस्तुलांची उघड विक्री होत असे. पण ती ब्रिटीशांच्या राज्यात छुप्या मार्गाने आणावी लागत होती. त्यासाठी नागनाथ आण्णा, जी.डी.लाड त्यांचे सहकारी यांनी ताईंना मदतीला घेतले. तेथे ताईंनी आपला पोशाख कोकणी पध्दतीचा केला. त्यांनी खरेदी केलेली पिस्तुले व काडतुसे गोवा सरहद्दीवर आंणण्यासाठी घाटाचा प्रवास पायी व आडमार्गाने करावा लागे. ताईंनी शेतकरी बाईचा वेश करून डोकीवर शाल आणि पिशवी घेवून निघाल्या. त्यांच्याबरोबर असलेले सगळे सहकारी जंगलातून निघाले. एवढयात पोलीसांनी त्यांच्यावर छापा टाकला. पोलीसांनी ताईंना अडवले. सर्वांची झडती घेतली पण काहीही सापडले नाही. मग्रुर पोलीसांनी ताईला कमरेस खोचलेला पदर झाडण्याचा आदेश दिला. त्याचवेळी ताईंनी पदर काढून झाडला त्याचवेळी एक जीवंत काडतूस पोलीसांच्या पायाजवळ पडले. त्याचा कच असा आवाज आला. पण ताईंनी एक शेलकी शिवी हासडून माझी बांगडी फुटली असे म्हणून पटकन पोलीसांच्या लक्षात यायच्या आत ते काडतूस उचलून निरेत खोचले. आणि हात झटकून ताई निवांत पोलिसांसमोर उभ्या राहिल्या.[२७] डोकीवरून बांधलेली शाल काढून तीही झटकून दाखवली. आक्षेपार्ह असे त्यावेळी काहीच आढळून न आल्याने पोलीसांनी त्यांना सोडून दिले. क्रांतीकार्याच्या पहिल्या सलामीतून ते सहीसलामत सुटले.

## खजिना लुटीत सहभाग :

प्रतिसरकारचे कार्य करत असता क्रांतीकारकांची आर्थिक ओढाताण होवू लागली. म्हणून त्यांनी सरकारी खजिन्यावर धाड टाकण्याचा निर्णय घेतला. क्रांतीवीर नागनाथ नायकवडी, जी.डी.बापू लाड यांनी धुळयाचा खजिना लुटण्याचा निर्णय घेतला. तत्पूर्वी त्यांनी ताकारीजवळ पगार ट्रेन लुटली. धुळा खजीना लुटीत प्रत्यक्ष सहभागी होण्याचा

ताईंनी विचार केला. शस्त्रे वाहूननेण्याचे काम त्यांनीच केले. प्रत्यक्ष त्यांच्या सहभागाने काही अडचणी येतील असे सांगितल्यावर 'आम्हा बायकांना तुम्ही काय समजता?' असा खडा सवाल ताईंनी भूमिगतांना केला. अखेर राजुताईंनी दुसऱ्या फळीत काम करावे असे ठरले. एप्रिल १९४४ ला सर्व सहकाऱ्यांनी मिळून चिमठाणे येथे खजिना लुटला. प्रथम तो खजिना गजपंथास नेवून ठेवला. वातावरण निवळल्यानंतर तो लोखंडी पेठाऱ्यातून वाळवे तालुक्यात आणण्यात आला. त्यातील काही रक्कम राजुताईंच्या घरात भींतीलगतच्या खड्डयात पुरून ठेवण्यात आली.[२८]

प्रतिसरकारच्या चळवळीसाठी या खजिन्याचा फार चांगला उपयोग झाला. भारतीय स्वातंत्र लढयाच्या इतिहासात हि एक भव्य आणि दिव्य कामगिरी क्रांतीकारकांनी घडवून आणली. या कामगिरीत राजुताईंनी आपल्या स्त्री शक्तीचा एक साक्षात्कारच घडवून दाखवला.

**गिलबर्टला चकवले :**

सातारचे पोलीस प्रमुख गिलबर्ट यांनी क्रांतीकारकांना पकडून जेलबंद करण्याचा विडा उचलला. प्रतिसरकार मोडण्याची खास कामगिरी स्विकारली. दरम्यान नागनाथ नायकवडींनी, स्वामी रामानंद भारतींची एक सभा २६ जानेवारीला बोलावली होती. सभेसाठी दीड - दोनशे कार्यकर्ते येणार होते. त्यांच्या जेवणाची सोय राजुताईंच्या घरी करण्यात आली होती. राजुताईंच्या घरी कार्यकर्ते जमा झाले आहेत ही बातमी गिलबर्ट ला समजताच त्याने पाच - पंचविस पोलीसांसह राजुताईंच्या घरावर छापा घातला. अचानक छापा पडलेला पाहून सगळेच घाबरून गेले पोलीसांनी राजुताईंच्या घरात दिसेल त्याला दंडूक्याने ठोकून काढले. गिलबर्ट तोंडाने मोडक्या तोडक्या मराठीत राजुमती कुठे आहे असे ओरडत होता. तोंडाने शिव्या देणे व लोकांना सडकून काढने हा सपाटा चालूच होता.[२९]

स्वामींना गिलबर्टने इतरांची नावे सांगण्याबाबत धमकावले तेव्हा स्वामींनी हिंम्मत असेल तर आत जावून बघा व नंतर मला गोळी घाला असे उत्तर दिले. नायकवडी, वाय.सी. पाटील, बाबूराव कोकाटे या सर्वांनी पोलीसांची चाहूल लागताच पळ काढला होता. राजुताईंनी प्रसंगावधान राखून भाकरी भाजायला बसलेल्या महिलेला चुलीपुढून उठवले आणि पटकन त्याजागी डोकीवर पदर घेवून त्या भाकरी बडवत बसल्या. गिलबर्टने त्यांना बोलावून विचारले राजुमत्ती कुठे आहेत त्या म्हणाल्या ' मी सुमती आहे राजुमती नाही ' तेवढे वाक्य ऐकून गिलब्रर्ट वळला. गिलबर्ट पाठमोरा होताच राजुताई थेट परस दारात पळाल्या भींतीतील ताईबाईच्या दिवळीत पाय ठेवून भिंतीवर चढल्या आणि भिंतीवरून सरळ खाली उडी टाकून सभास्थानी तयारीला लागल्या.

भूमिगत अवस्थेत असताना राजुताई एका घरात लपून बसल्या त्या घर मालकीनीचे नाव येसाबाई. राजुताईच्या शोधासाठी पोलीसांनी गल्लीभर शोधाशोध केली. दिवे लागण झाली होती. राजुताईंना त्या ब्राईने नऊवारी लुगडे नेसवले व दळण दळायला लावले पोलीसांना ऐकू जाईल अशा आवाजात ती राजुताईंवर ओरडली ' अग ए बघतीस काय? पोरगा उद्या पाटचा जाईल नांगरायला घरात जरासुध्दा पीठ नाही तेवढयात पोलीस तिथे येवून पोहोचले व त्यांनी मावशीबाई कोणावर ओरडता असे विचारले तेव्हा त्यांनी सुनेचे नाव सांगितले पोलीस गपगुमान निघून गेले.[३०]

अशाच एका प्रसंगी राजुताईंनी शोधव्याख्या निमित्ताने ऐतवडे बुद्रुक येथील त्यांच्या घरावर पोलीसांनी छापा टाकला. राजुताई हाताला लागत नाहीत म्हणून त्यांचा भाऊ आदगोंडाला पकडून नेले.

### बावचीच्या गुंडाचा बंदोबस्त :

ब्रिटीशांना मदत करणारा आणि क्रांतीकारकांना त्रास देणारा एक बावचीचा गुंड संपवायचा असा राजुताईंनी निर्धार केला. सुरवातीस त्याच्या सर्व हालचाली स्वतः

न्याहाळल्या. तो गुऱ्हाळावर काम करतो असे समजले. हे काम स्वत:च करायचे असे त्यांनी ठरविले. बाबुराव कोकाटे, खोत वस्ताद, देवास, येसू तात्या वगैरे पाच सहा सहकारी गोळा केले. संध्याकाळची वेळ. नऊवारी साडी चोपून चापून नेसली, पॉकेट पिस्तूल लोड केले. इतरांकडे पिस्तूल दिले.

ऊसाच्या फडातून सगळेजण अंधारातच पुढे सरकले. गुऱ्हाळकर्त्यांनी ताईना ओळखले. दिव्याच्या प्रकाशात ताईंनी सावज हेरले होते. अंगातले रक्त सळसळत होते. आता विलंब करुन चालणार नव्हते. सगळे गुऱ्हाळकरी लपून बसले. ताईंनी त्या इसमाची कॉलर धरली त्याने आपले सारे बळ एकवटून ताईशी झटापट सुरु केली. 'धरा पकडा मारा' असा कल्लोळ सुरु झाला. ताई एखाद्या जखमी वाघिणीप्रमाणे त्याच्यावर उसळून उठत होत्या. बऱ्याच प्रयत्नानंतर त्याने आपली सुटका करवून घेतली व तो पळू लागला त्याबरोबर तांईनी कमरेचे पिस्तुल काढून त्याच्या दिशेने चाप ओढला. पिस्तुलातून गोळया सुटल्या आणि क्षणार्धात त्या गुंडाचा मुडदा जमिनीवर कोसळला. ताई जिंकल्या त्यांचे सर्व सहकारी आनंदाने जल्लोष करीत एकत्र आले. रात्रभर अंधरातून चालत अंकलखोपची मळी गाठली यानंतर ताई भूमिगत झाल्या.[३१]

कर्मवीर भाऊराव पाटील हे राजुताईच्या भावकीतले. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली व बहुजन समाजाच्या शिक्षणप्रसारासाठी मोलाचे कार्य केले. पण त्यांच्या कार्याची फारशी दखल तत्कालीन धुरीनांनी घेतली नाही. उलट त्यांना निंदवले जाई पण नागनाथ नायकवडी, राजुताई पाटील, बाबूराव कोकाटे, वाय.सी.पाटील इ. यांनी मात्र त्यांना सहकार्य केले. १९४५ साली कर्मवीर हृदयविकाराने आजारी होते. मुंबई येथे उपचार सुरुहोते. तेंव्हा या कार्यकर्त्यांनी नायपीट करुन १ लाखाचा निधी जमा करुन त्यांना दिला.

**काडतुसांची वाहतूक :**

राजुताई काडतुसाच्या वाहतूकीमध्ये फारच तरबेज होत्या. त्यांनी मिळवलेली सर्व काडतुसे सरकारी कोठ्यातूनच मिळवली आहेत. त्यावेळी ब्रिटीशांच्या मिलीटरीमध्ये आपलेच स्वातंत्र्यप्रेमी जवान नोकरीस होते. ते ब्रिटीशांच्या स्टोअरमध्ये असलेली काडतुसे कार्यकर्त्यांना पुरवित असत. देशसेवक कॅप्टन देशपांडे हे बेळगांव मिलिटरी कॅम्पमध्ये होते. ते बेळगांव स्टोअरमधून हवी तेवढी काडतुसे देत. चार्ज देतांना अगर घेताना काडतुसे मोजण्याची प्रथा मिलिटरीमध्ये नसे. त्याचा फायदा बरोबर या मंडळीनी घेतला. त्या तारखा राजूताईना दोनचार दिवस आधी कळत.[३२]

कॅम्पस्मध्ये जळण गोळा करण्याऱ्या बाईचा वेश घेवून ताई जात. डोकीवरच्या पुडक्यात एखादी पिशवी बांधलेली असे ताई कॅम्पभोवती संशय न येईल अशा फिरत रहात. कंपाऊडमध्ये पुडके टाकत संबंधित मनुष्य येवून ती पिशवी घेवून स्टोअरमधून गुप्त रितीने काडतुसे भरुन घेई व कंपाऊंडच्या बाहेर ठेवून देई. राजुताई ती पिशवी भातांच्या पिंजऱ्यात घाली व बेमालूमपणे इंग्रज अधिकाऱ्यांच्या समोरुनच कॅम्पबाहेर पडत सुदैवाने ताईंना एकदाही कोणी अडवले नाही. रेल्वे स्टेशन बाहेर आल्यानंतर ताई पुन्हा वेश बदलत त्यावेळी सुगरणीचा वेश घेवून कोणत्यातरी पाहुण्याच्या गावी निघाल्याप्रमाणे काडतुसाची पिशवी घेवून त्या रेल्वेत बसत. एका टोकाला ताई बसत तर दुसऱ्या टोकाला काडतुसाची पिशवी, ताई अशा पध्दतीने बसत की त्या पिशवीचा आणी ताईंचा काडीचाही संबंध नसावा. जरी एखाद्याने पाहिले तरी काडतुसाची पिशवी जाईल पण ताई सुरक्षित.[३३]

कामेरीमध्ये गुंडाचे प्रस्थ फार मोठे होते. त्यांनी खंडणीसाठी जनतेला त्रास देण्याचे सुरु केले. कामेरी गावचे तुकाराम पाटील यांनी राजुताईकडे या गोष्टीची तक्रार मांडली. पैलवान आणि राजुताई यांनी आपले सहकारी एकत्रित केले. ( एस.बी.पाटील, गणपतराव जाधव, छगनबापू, वाय.सी.पाटील,नागनाथ आण्णा) हे सर्वजण तुकाराम पाटलांच्या शेतात गेले. झुडपे काढली बारपट्टे त्यांना अडवायला आलाच नाही गुंडांना क्रांतीकारकांचे

हे उद्योग अडचणीचे वाटू लागले. त्यामुळे बदला घेण्याचे सत्र अवलंबले. त्यातुनच ऐतवडे हल्ला प्रकरण घडले.

ऐतवडे येथे सामुदायिक शेतीचा विचार करून एक मिटींग बोलावली होती. त्यावेळी बाबूराव कोकाटे हे स्वत:च्या लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी राजुताईंकडे आले होते. तर प्रताप पाटील हे भाऊराव पाटलांच्या निधीपैकी काही गोळा केलेली रक्कम घेवून आले होते. जैन वस्तीत मिटींग झाल्यानंतर राजुताईंच्या वाडयात कोकाटे आणि प्रताप पाटील माडीवर झोपले असता एका गुंडाने वाड्यावर हल्ला चढवून त्या दोघांनाही ठार केले. ही बातमी अंकलखोप येथे पैलवानांना समजताच त्यांनी त्या इसमाचा पाटलाग करून त्याला संपवल.

## क्रांतीसिंह नाना पाटलांच्या सुटके साठी मदत :

वसंतराव पाटील व्याकूडकर या क्रांतीकारकाचे लग्न एका सामुहिक विवाह सोहळयात होणार होते. त्यासाठो सांगली सातारा भागातील कित्येक कार्यकर्ते हजर झाले होते. त्यात कर्मवीर भाऊराव, क्रांतीसिह नाना पाटील, नागनाथ नायकवडी, वाय.सी.पाटील. या सामुदायिक सोहळयासाठी ताईंनी पुढाकार घेतला.[३४] क्रांतीसिंह लग्नाला आले आहेत ही बातमी समजताच फौजदार आपल्या फौजफाटयासह येवून पोहोचले . पोलीस काही अंतरावर होते. फौजदार मांडवात आले .त्यावेळी कर्मवीर व क्रांतीसिह बसले होते. फौजदारांनी क्रांतीसिहांना पकडण्याची घोषणा केली. तेव्हा वसंतराव पाटील म्हणाले ''तुम्ही नानांना पकडू शकता, पण लग्नात विघ्न आणू नका लग्न शांततेने पार पडू द्या''तो पर्यंत नानांना आम्ही एका खोलीत कोंडून ठेवतो व किल्ली तुमच्या ताब्यात देतो. खोलीची किल्ली ताब्यात आल्यामुळे फौजदार निवांत झाले. पोलीसांना क्रांतीसिह माहित नसल्यामुळे ते कर्मवीरांना क्रांतीसिंह समजून त्यांच्यावर नजर ठेवून राहिले. सर्व क्रांतीकारक चिंतेत पडले. राजुताईंना एक युक्ती सुचली . त्या एक नउ

वारी लुगडे नेसल्या कपाळावर मळवट भरला, डोकीवरून पदर घेऊन धनगरणीचा वेश धारण केला. ज्या खोलीत नानांना कोंडले होते त्या खोलीच्या तीन बाजूंना पहारा होता. एकाच बाजूला थोडी मोकळी जागा होती. क्रांतीसिहांना तांबडा फेटा गुंडाळण्यात आला होता. पायात जाडजूड जोडे, धोतर आणि हातात काठी असा धनगराचा वेश देण्यात आला. कार्यकर्त्यांनी घोळका करून कुलूप फोडले. क्रांतीसिंह व राजुताई हातात बोचके घेऊन आरामात घोळक्यातून बाहेर पडले. पोलीसांना थोडीही शंका आली नाही. नाना सुटले ही बातमी समजताच फौजदार मात्र अतिशय संतप्त झाला. सर्व क्रांतीकारक मनोमन खूष झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळाले चळवळ संपली. तरी राजुताईंची गुंडाविरोधी चळवळ १९५० पर्यंत चालू होती. [३५] 'खून का बदला खून ' या न्यायाने चळवळीत ताई व पैलवान बिरनाळे यांनी कित्येकांना यमसदनास पाठवले. राजुताईंच्या वयाने आता तीशी गाठली होती. आता पूढे काय हा प्रश्न त्यांना पडला. चळवळीचा ताईंचा कार्यभार संपला होता. देशाला स्वराज्य मिळाले होते. त्या आता एकटयाच राहिल्या होत्या. त्यांच्या भावना समजू शकणारी एकच एक जीवाभावाची मैत्रीण राहीली होती. ती म्हणजे रिव्हॉल्वर---. एक काडतूस ताईनी स्वतःवर चालविण्याचा विचार केला. तत्पुर्वी क्रांतीकारकांचे आश्रयदाते असलेल्या आष्टे गावच्या भालचंद्र पोरवाल यांच्याकडे ताई गेल्या. ताईंचा निर्णय ऐकल्यानंतर त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांनी खूप विचार केला. ताईच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व भविष्याच्या दृष्टीने पैलवान बळवंत बिरनाळे यांनी दूसरे लग्न करून घ्यावे असा त्यांचा विचार झाला. पैलवान व त्यांची प्रथम पत्नी इंदुमती, आई रूक्मीणी बाई यांनी तांबडतोब संमती दिली. सर्व क्रांतीकारकांच्या साक्षीने राजुताई बळवंतराव बिरनाळे यांच्याशी विवाहबध्द झाल्या. [३६] सुगृहिणींच्या पर्वाला त्यांनी प्रारंभ केला.

एकंदरीत राजुताईंचे व्यक्तीमत्व असामान्य असे होते. आपल्या आयुष्यभरामध्ये वेगवेगळया भूमिका त्यांनी वठवल्या. प्रत्येक भूमिकेमध्ये त्यांनी आपले प्राण ओतले. देशासाठी तळहातावर शिर घेऊन त्या लढल्या.

वरील प्रमुख स्त्रियां शिवाय

१. आष्टेकर कलावती तातोबा

२. देशपांडे विमल विश्वनाथ

३. देशपांडे सेतूताई बन्याबापू

४. देशपांडे सोनूताई अच्युत

५. माळी अक्कुबाई बाबाजीराव

६. यादव आक्काताई बाबूराव [३७],

या स्त्रियांनी १९४२ च्या चलेजाव चळवळीत भूमिगत आंदोलनाचे जे कार्यकर्ते होते. त्यांना प्रसंगी सहाय्य व आसराही दिला. तर काहींनी १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेऊन स्वातंत्र्य लढयाच्या चळवळीत खारीचा वाटा उचलला आहे.

एकंदरीत स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीच्या प्रारंभापासून ते अखेरपर्यंत प्रत्येक टप्यात, प्रत्येक लढा प्रकारात, विविध विचार सरणींनी चालणाऱ्या, विविध कष्टकरी वर्गांच्या हितरक्षणासाठी चालणाऱ्या राष्ट्रीय हिताच्या स्वातंत्र्य चळवळीत आपल्यावरील सर्व बंधने बाजूला सारून नि:स्वार्थी पणे स्वतःला झोकून दिले. ही गोष्ट अखिल स्त्री वर्गाला अभिमानास्पद वाटावी अशीच आहे.

## संदर्भ - सुची

१. श्री. कुलकर्णी मोहन लक्ष्मण - कासेगांव - मुलाखत

२. श्री. कुलकर्णी दत्तात्रय लक्ष्मण - (कासेगांव) - मुलाखत

३. स्वा.सै. श्री. पाटील मारुती यशवंत - (कासेगांव) - मुलाखत

४. क्रा. श्री. नायकवडी नागनाथ - मुलाखत

५. श्री. नलवडे द.ब. - अप्राकाशित एम.फिल. प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (१९८८) - सातारच्या प्रतिसरकारमधील स्त्रियांचा सहभाग

६. श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

७. स्वा.सै. श्री. देशपांडे डी.जी. - मुलाखत

८. स्वा.सै. श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

९. दै. ऐक्य - दि. १५ ऑगस्ट, १९८९

१०. ---- कित्ता ----

११. ---- कित्ता ----

१२.श्री. पाटील सुभाष पांडूरंग -( येडेनिपाणी) - मुलाखत

१३.स्वा.सै. पाटील दत्तात्रय ज्ञानदेव - (कासेगांव) - मुलाखत

१४.स्वा.सै. जगताप पांडूरंग गोविंद - (येवलेवाडी) - मुलाखत

१५.श्री. बर्डे अशोक दादासो - (वाटेगांव) - मुलाखत

१६.श्री. शेटे विमलनाथ - हस्तलिखीत - सेवाशील व धाडसी श्रीमती आक्काताई बर्डे - पृष्ठ - ७

१७.स्वा.सै. देशपांडे डी.जी. - (इस्लामपूर)- मुलाखत

१८.स्वा.सै. थोरात विनायक विलासराव - वाळवा - मुलाखत

१९.श्री. सनदे सा.बा. - जिवन संग्राम - पृष्ठ -२८

२०.---- कित्ता ----

२१.श्रीमती पाटणकर इंदुताई - मुलाखत

२२.संपादक डॉ.भोसले अरुण - शिवाजी विद्यापीठ इतिहास प्राध्यापक परिषदेचे मुखपत्र - संशोधन पत्रिका - पृष्ठ -४८

२३.श्री. कोगनुळे विजय - रणरागिणी राजुताई - पृष्ठ -१३

२४.स्वा.सै. श्रीमती पाटील राजुमती - (अंकलखोप) - मुलाखत

२५.क्रां. नायकवडी नागनाथ - मुलाखत

२६.संपादक डॉ. भोसले अरुण - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -४८

२७.श्री. कोगनुळे विजय - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -२५

२८.क्रां. नायकवडी नागनाथ - मुलाखत

२९.श्री. कोगनुळे विजय - उपरर्निर्दिष्ट - पृष्ठ -३१

३०. ---- कित्ता ----पृष्ठ - ३३

३१.स्वा. सै. वग्यानी बाळासाहेब - ( आष्टा ) -मुलाखत

३२.स्वा.सै. पाटील रंगराव दादा -( शिगांव )- मुलाखत

३३.संपादक डॉ. भोसले अरुण - उपरनिर्दिष्ट - पृष्ठ -४९

३४.स्वा.सै. श्रीमती जगताप सोनाबाई शंकर - (येवलेवाडी )- मुलाखत

३५.स्वा.सै. पाटील रंगराव दादा - मुलाखत

३६.स्वा.सै. सनदे सा.बा. - (आष्टा) - मुलाखत

३७.स्वातंत्र्य सैनिक : चरित्र कोष, महाराष्ट्र राज्य पश्चिम विभाग